Application from retired Government Officers in cadre of Group A (Grade Pay less than Rs.7600) &Group B

**महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग**
**राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय**
**७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई -४०० ०३२.**

**दि. २२ जानेवारी, २०२६**

शासकीय/ निमशासकीय सेवेतून गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी)/ गट-ब संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | गट अ (ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) किंवा गट- ब | "महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकरण/विभाग यांच्या सेवा देण्याच्या कामकाजाविषयी मुल्यमापन करणे व सांख्यिकी माहितीचे विश्लेषण व आयोगाचा वार्षिक अहवाल तयार करण्याच्या कामी सर्व आवश्यक ती कार्यवाही इ." | गट अ(ग्रेड वेतन रु.७,६००/- पेक्षा कमी) / गट-ब पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षांचा अनुभव<br>अर्हता:- पदवीधर.<br>संगणकाचे ज्ञान, तसेच लेखापरिक्षणाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा :- ५८ ते ६४ वर्षे |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दि. १०.०६.२०२५ अन्वये, नियुक्तीच्या अटी व शर्ती विनियमित करण्यात येतील.
२. करारपद्धतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही.
३. करार तत्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.
४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपद्धतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.
५. करारपद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह **ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. ०६.०२.२०२६ पर्यंत सादर करावेत.**

**संपर्क** :- राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, ७ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२

**दूरध्वनी :- ०२२ -२२८३२३४६**

**ई-मेल** :- ccrts@maharashtra.gov.in

मा.मुख्य आयुक्त यांच्या मान्यतेने

(वैशाली राज चव्हाण {निर्धार})
सचिव
महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग

C:\Users\ramesh.sud\Desktop\आस्थापना\प्रिती परव -२०२५\जाहिरात -२०२६.docx